

# जिद्द आणि चिकाटी

**आर्मीतील जवानांकडे समाजही चांगल्या नजरेतून बघतो. कुटुंबालाही एक स्टेटस मिळतं. खरं तर प्रत्येक जवान हा ऑल राउंडर असतो प्रत्येक सैनिकाच्या जीवनात लढाईच्या क्षणाचं महत्त्व वेगळंच असतं...**

इंडियन आर्मीबद्दल लोकांच्या मनात नेहमीच आदर असतो. भारताचे हे शूर जवान प्राणांची आहुती देऊन आपल्या बॉर्डरचं रक्षण करतात. भारताच्या कानाकोपऱ्यातून आलेले हे जवान इथे एका कुटुंबाप्रमाणे राहतात. आमची सुखदु:ख आम्ही एकमेकांशी शेअर करतो. हाडवर्क, प्रामाणिकपणा व इंटेलिजंस ही त्यांची प्रमुख वैशिष्ट्य आहेत. म्हणूनच इंडियन आर्मीकडे सर्वजण मानाने बघतात.

एका आर्मी जवानाची लाईफ स्टाईल कशी असते ते जाणून घेण्यासाठी लेफ्टनंट कर्नल एस. पी. दळवी (रिटायर्ड) यांच्याशी बातचीत केली.

लेफ्ट कर्नल एस. पी. दळवी (रिटायर्ड) म्हणाले, ''मी दहावीत असतानाच आर्मी जॉइन करण्याचा निर्णय घेतला. रुपारेल कॉलेजात असताना एक वर्ष एन.सी.सी. केलं. ग्रॅज्युएशननंतर सी. डि. एस. सी. परीक्षांना बसलो. जुलै ७५ ला आय. एस ए. जॉईन केलं. १५ डिसेंबर १९७६ला कमिशन मिळालं. तो माझ्या जीवनातील खरा आनंदाचा क्षण.''

बावीस वर्षे सर्व्हीस केल्यानंतर रिटायर्ड झालेल्या एस. पी. दळवी यांनी एम. बी. ए. केलं, आज ते स्वत:ची 'मार्गदर्शक करिअर ॲकॅडमी' चालवत आहेत. यात आर्मीमध्ये करीअर करू पाहणाऱ्या मुलांना दळवी मार्गदर्शन करतात. सर्व्हिसमध्ये दोन वर्षे ते काश्मीरमध्ये आपल्या रेजिमेंटबरोबर होते. काही काळ नागालॅण्डमध्ये आणि भारत-चीन सीमेवरही होते. तिथे बजावलेल्या कामगिरीकरता मेडल्सही मिळाली आहेत.

**लाईफ स्टाईल**

• लेफ्ट. कर्नल एस. पी. दळवी.

लेफ्ट. कर्नल दळवी आपल्या आर्मी लाइफबद्दल बोलताना म्हणाले ''विद्यार्थी होतो तेव्हा अभ्यास आणि त्यानंतर मनोरंजन एवढंच लाईफ होतं. पण आर्मी जॉईन केल्यावर सगळंच बदललं. रोज सकाळी पाच वाजता पी.टी, त्यानंतर ड्रील. नाश्ता केल्यानंतर दुपारी दिड वाजेपर्यंत इन डोअर क्लासेस असायचे. त्यामध्ये वेगवेगळे विषय शिकवले जात. लंचनंतर पुन्हा क्रॉस कंट्री. ऑबस्टेकल्स आणि इतर गेम्स या गोष्टी असतातच. कंमाडो ट्रेनिंगसाठीही वेगळी मुलं निवडली जातात. आर्मीचं लाईफ एक बॅलन्स्ड लाईफ असतं. वेपन ट्रेनिंग, पी.टी, स्पोर्टस आणि कल्चरल ॲक्टीव्हीटी या सर्वांमुळे तुम्ही फिजीकली फीट बनता. आणि त्याचबरोबर तुमची पर्सनॅलिटीही डेव्हलप होत असते.''

इंडियन आर्मीचं बेसिक फाउंडेशन हे सिलेक्शन आणि ट्रेनिंगमध्ये आहे. या ट्रेनिंगमध्ये 'मॅन मॅनेजमेंट'ही शिकायला मिळतं. हुशार विद्यार्थ्यांना परदेशातल्या आर्मीबरोबर ट्रेनिंग करण्याची संधी मिळते. अशा ट्रेनिंगचा काय फायदा असतो ते आपण कारगिल युद्धात अनुभवलं आहे.

इंडियन आर्मी हे जगात चौथ्या क्रमांकाचं मोठे सैन्य आहे. एवढं मोठं सैन्य उभं करणे म्हणजे खाऊ नाही. विशेष म्हणजे आपलं सैन्य राजकारणापासून अलिप्त आहे.

आर्मीमध्ये बरचं काही शिकायला मिळालं. हार्डवर्क, चिकाटी, डेडीकेशन त्याचबरोबर डिसीप्लीन या गोष्टी त्यात प्रमुख आहेत. आर्मीतील जवानांकडे समाजही चांगल्या नजरेतून बघतो. कुटुंबालाही एक स्टेटस मिळतं. खरं तर प्रत्येक जवान हा ऑल राउंडर असतो. आपल्या रेजिमेंटबरोबर देशाच्या विविध भागात जाण्याची संधी त्याला मिळते. त्यामुळे देशातील विविधतेची माहीती मिळते.

लेफ्ट. कर्नल एस. पी. दळवी आपल्या कुटुंबाबद्दल म्हणाले ''आर्मीमध्ये असताना घराकडे पूर्ण लक्ष देता येत नव्हतं, त्यामुळे पत्नीलाच संपूर्ण घराची जबाबदारी सांभाळावी लागत होती.''

लढाईच्या वेळेच्या मानसिकतेचे वर्णन करताना दळवींनी सांगितलं, ''लढाईच्या वेळी सैनिक सर्व काही विसरुन जातो. समोरच्या शत्रुला कसं ठार मारायचं एवढाच विचार डोक्यात असतो. प्रत्येक सैनिकाच्या जीवनात लढाईच्या क्षणाचं महत्त्व वेगळंच असतं.''

लेफ्ट कर्नल शेवटी म्हणाले की आपल्या भारतीय सैन्याचं फ्युचर ब्राईट आहे आणि यंग जनरेशनला तर त्यात करीअर करण्याच्या अनेक संधी आहेत. गरज आहे फक्त चिकाटी आणि जिद्द यांची.

• प्रवीण मुळ्ये

pravinmulye@indiatimes.com